③ शिक्षण व्यवसाय मानवाचे संपूर्ण जीवन समृद्ध करणारा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. मानवाच्या सर्व प्रकारच्या वैयक्तिक आणि सामाजिक गरजा पूर्ण करणारे एकमेव क्षेत्र म्हणजे शिक्षण हे क्षेत्र होय. जीवनातील कोणत्याही प्रगतीचा आधार शिक्षण हाच असतो. इतर व्यवसायांचा संबंध मानवी जीवनाच्या कोणत्या तरी एका विशिष्ट क्षेत्राशी येत असतो परंतु शिक्षण हे मानवाच्या सर्वांगास स्पर्श करणारे असते. शिक्षण ही अत्यंत पवित्र ठरणारी बाब आहे असे प्राचीन काळापासून आजपर्यंत मानले जाते. कारण मानवास पशुपातळीवरून ईश्वरपातळीकडे घेऊन जाण्याचे, किंवा रानटी अवस्थेतून सुसंस्कृतपणाकडे घेऊन जाण्याचे कार्य शिक्षणच करते. देशाची भावी पिढी निर्माण करण्याचे कार्य ही शिक्षणच करते. देशाच्या किंवा समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक असणारे नेतृत्व निर्माण करण्याचे कार्यही शिक्षणच करते. अशा अनेक कारणामुळे शिक्षण व्यवसाय अतिशय महत्वाचा मानला जातो. त्यामुळे समाजाच्या या व्यवसायाकडून अनेक प्रकारच्या नैतिक अपेक्षा आहेत.

बदलत्या काळात समाजामध्ये अनेक परिवर्तने घडून आली. त्याचा स्वाभाविक परिणाम शिक्षणाच्या क्षेत्रावरही झालेला दिसून येतो. आज जागतिक पातळी अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या सर्वांवर एकच उपाय आहे. तो म्हणजे शिक्षण. परंतु आज शिक्षणाचे क्षेत्रच अनेक समस्यांनी ग्रस्त झालेले दिसून येते. समाजात घडून येणारे परिवर्तन ही आवश्यक बाब असली तरी हे परिवर्तन चुकीच्या पद्धतीने होत चाललेले दिसून येते. त्यामुळे इतर क्षेत्राप्रमाणेच शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. त्यांचे थोडक्यात स्वरूप पुढील प्रमाणे सांगता येते.

① शिक्षणाचा घसरत चाललेला दर्जा — शिक्षण याचा अर्थ व्यक्तीला सर्वांगाने सुसंस्कृत करणे असा होतो. परंतु आज केवळ विद्यार्थ्यांना साक्षर करणे किंवा निरनिराळ्या स्वरूपाची माहिती विद्यार्थ्यांच्या डोक्यात कोंबणे एवढाच अर्थ उरला आहे. विशिष्ट अभ्यासक्रम विशिष्ट मुदतीत शिकवून विद्यार्थ्याला परीक्षेसाठी तयार करणे एवढीच बाब आज शिक्षणात उरली आहे. शिक्षणाची अनेक ध्येये सांगितली जातात. परंतु त्यापैकी एकही ध्येय साध्य होताना दिसून येत नाही. इंग्रजांनी सुरु केलेली कारकून निर्माण करणारी शिक्षणपद्धती आजही सुरु असल्याने शिक्षणाचा दर्जा दिवसेंदिवस खालावत चालला आहे.

② शिक्षकांच्या चारित्र्याचा / आदर्श वर्तनाचा अभाव :- विद्यार्थी अनुकरणप्रिय असतात. नकळतपणे ते शिक्षकांचे अनुकरण करत असतात. त्यामुळे शिक्षकांचे चारित्र्य किंवा वर्तन अनुकरणीय असले पाहिजे. शिक्षकांचे व्यक्तिमत्व किंवा चारित्र्य कसे आहे यावरच शिक्षक व विद्यार्थी यांचे संबंध निर्माण होत असतात. शिक्षकांचे व्यक्तिमत्व हे त्याची जीवननिष्ठा, त्याची विचारसरणी त्याचा व्यवसायाकडे किंवा विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन यावर ठरत असतो

दुर्दैवाने या सर्व गोष्टी कमी होताना दिसून येत आहे. 'पैसा' हे एकमेव मानवी मूल्य बनल्यामुळे इतर गोष्टींकडे गांभीर्याने पाहण्याची वृत्ती लोप पावत चालली आहे.

③ आर्थिक गैरव्यवहार – व्यवसायाचा हेतू उपजिविकेसाठी अर्थार्जन करणे हा असला तरी आज अतिरिक्त हव्यासामुळे इतर क्षेत्रांप्रमाणे शिक्षणाच्या क्षेत्रातही प्रचंड प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार वाढलेले दिसतात. हा गैरव्यवहार केवळ शिक्षकांपुरताच मर्यादित राहिलेला नाही तर संस्थाचालक असेच विद्यार्थी ~~स्वतः~~ शिक्षक देखील या गैरव्यवहारापासून अलिप्त राहू शकला नाही.

④ शासनाचा बेजबाबदारपणा – देशाच्या आणि समाजाच्या उत्कर्षासाठी शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. त्यामुळे इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा शिक्षणाच्या क्षेत्राकडे अधिक लक्ष देणे हे कोणत्याही शासनाचे मूलभूत कर्तव्य आहे. परंतू दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. इतर देशांच्या तुलनेत भारतात शिक्षणाकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टिकोन नेहमीच बेजबाबदारपणाचा राहिला आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात ज्या मूलभूत सुविधा आणि सुधारणा अपेक्षित होत्या त्यांची पूर्तता आजपर्यंत झालेली दिसून येत नाही. जुनी कालबाह्य पद्धत तशीच सुरु ठेवणे, समाजाच्या गरजानुरूप शिक्षणात बदल न करणे, शिक्षणविषयक तज्ञांनी सुचवलेल्या शिफारसींची अंमलबजावणी न करणे, गुणी, किंवा बुद्धीमान व्यक्ती या क्षेत्राकडे आकर्षित व्हाव्यात असा प्रयत्न न करणे, भ्रष्ट अधिकारी किंवा धंदेवाईक संस्थाचालक यांच्यावर अंकुश न ठेवणे यासारखे कोणतेही कार्य शासनाकडून व्यवस्थित झाले नाही.

⑤ समाज किंवा पालकांची उदासिनता – शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक समजला जातो. शिक्षकाच्या सूचनेनुसारच समाज किंवा शासन कार्य करत असते. शिक्षक ही एक सर्वात महत्वाची शक्ती आहे असे जवळपास सर्वच समाजात मानले जाते. परंतू आज ही स्थिती बदलली आहे. ज्या शिक्षकाच्या हातात आपल्या मुलांचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे भवितव्य सामावलेले आहे, त्या शिक्षकाच्या अडीअडचणी, समस्या किंवा सुखदुःखा बद्दल आज समाज उदासिन बनला आहे. शिक्षकांवर होणारा अन्याय किंवा त्याच्या समस्येबद्दल पालकवर्गास कसलेही देणेघेणे उरले नाही. आपला पाल्य कसा उत्तीर्ण होईल एवढीच चिंता त्यांना असते. शिक्षकांबद्दल आदर, प्रतिष्ठा, सन्मान या गोष्टी केवळ उपहास, हेटाळणी होताना दिसून येते. याचा गंभीर परिणाम शिक्षणप्रक्रियेवर होतो.

शिक्षणक्षेत्रातील समस्या दूर करावयाच्या असतील तर त्यासाठी सामुहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. शासन, समाज, पालक किंवा संस्थाचालकांनी आपल्या कर्तव्याचे भान राखून आपल्या वर्तनात बदल घडवून आणला तर निश्चितच या क्षेत्रातील समस्या दूर होण्यास मदत होऊ शकते. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे शिक्षण प्रक्रियेतील दोन महत्त्वाचे घटक असणारे शिक्षक आणि विद्यार्थी यांनी जर आपले आचरण नैतिक ठेवले तर इतर प्रयत्नांची फारशी आवश्यकता उरणार नाही.

(5)

### शिक्षकाची आचारसंहिता –

1. शिक्षकाने आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहिले पाहिजे.
2. शिक्षकाने आपले वर्तन आणि व्यक्तिमत्व नैतिक बनवले पाहिजे.
3. सर्व प्रकारच्या आर्थिक गैरव्यवहारापासून दूर राहिले पाहिजे.
4. आपल्या विषयाचे तसेच सभोवताली घडणाऱ्या घटनांचे ज्ञान असले पाहिजे.
5. विद्यार्थ्यांशी आत्मियतेचे व जिव्हाळ्याचे संबंध ठेवले पाहिजेत.
6. आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा जोपासली पाहिजे ती वृद्धिंगत केली पाहिजे.
7. समव्यावसायिक, इतर व्यावसायिक किंवा संस्थाचालकांशी चांगले संबंध ठेवावेत.
8. लोकशाही मूल्यांचा अंगीकार करून तशा स्वरूपाचे वर्तन करावे.
9. सर्व प्रकारच्या सामाजिक कार्यात सहभाग नोंदवावा.
10. सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेची जोपासना करावी.

कोणत्याही शिक्षणप्रक्रियेच्या सर्वात महत्त्वाचा घटक शिक्षक हाच असल्याने त्याने वर प्रतिपादन केलेल्या आचारसंहितेचे पालन केले तर या व्यवसायातील समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

### विद्यार्थ्यांची आचारसंहिता:

(1) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे ध्येय आहे. ते साध्य करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

(2) शिक्षणसंस्थेच्या सर्व नियमांचे प्रामाणिक पालन केले पाहिजे.

(3) गरजू किंवा होतकरू विद्यार्थ्यांना मिळणारी मदत आवश्यक असेल तरच स्वीकारली पाहिजे.

(4) सर्व प्रकारच्या गैरव्यवहारापासून अलिप्त राहिले पाहिजे.

(5) सांस्कृतिक कार्यक्रमाच्या वेळी आपल्या संस्कृतीचे पावित्र्य राखले जाईल याची दक्षता घेतली पाहिजे.

(6) अभ्यासविषयक सर्व बाबींचे कटाक्षाने पालन केले पाहिजे.
(7) उच्च प्रतीची खिलाडू वृत्ती अंगी बाळगली पाहिजे.
(8) सर्व प्रकारच्या समाजहित कारक उपक्रमात सहभाग नोंदवला पाहिजे.

अशा काही सहजशक्य बाबींचे पालन विद्यार्थ्यांनी केले तर निश्चितच या क्षेत्रातील समस्या कमी होण्यास मदत होऊ शकते.